# १८५७ च्या उठावातील बेगम हजरत महाल यांचे योगदान

**प्रा.हमीद उमरअली काझी.** इतिहास विभाग प्रमुख.कला आणि वाणिज्य महाविद्यालय,कळंब-वालचंदनगर,ता.इंदापूर,जि.पुणे.

---

सारांश :- १८५७ च्या उठावात बेगम हजरत महाल यांचे योगदान मोठे आहे.अवधचे नबाब वाजिदअली शाह यांच्या त्या पत्नी होत.लॉर्ड डलहौसीने अवध प्रांत खालसा करुन ब्रिटीश साम्राज्यात विलीन केला व नबाब वाजिदअली शाह यांना कैदेत ठेवले.ठरल्याप्रमाणे अवधमधे उठाव झाला.नबाब वाजिदअली शाह यांचा ११ वर्षांचा पुत्र बिरजीस कादर यांना गादीवर बसविण्यात आले. ते अल्पवयीन असल्याने त्यांच्या वतीने त्यांची आई बेगम हजरत महाल राज्यकारभार पाहु लागल्या.त्यांनी राज्यकारभारासाठी विविध खात्यांची निर्मीती करुन त्यावर कार्यक्षम अशा व्यक्तिंच्या नियुक्त्या केल्या.त्यांच्या वेळोवेळी बैठका घेतल्या.अवधचा राजदरबार नित्यनेमांनी भरविला जात होता.व त्यात स्वतः बेगम उपस्थित रहात होत्या.भारतातील सर्व ठिकाणचे उठाव ब्रिटीशांनी मोडुन काढले पण अवधचा उठाव चालुच होता.याचे श्रेय बेगम हजरत महाल यांना दिले जाते.सर्व ठिकाणचे उठाव मोडुन काढल्यानंतर ब्रिटीशांना आपली संपूर्ण शक्ती अवधमध्ये एकवटता आली.परिणामी अवध ब्रिटीशांच्या ताब्यात गेले.पण बेगम हजरत महाल यांनी ब्रिटीशांपुढे शरणागती पत्करली नाही.त्यांच्या पदाला साजेसा बहुमान देण्याची तयारी कंपनी सरकारने दाखवली पण तो नाकारुन बेगम हजरत महाल यांनी स्वाभिमान व देशभक्ती दाखवली.त्याकाळी जगातील सर्वात बलाढ्य असणाऱ्या ब्रिटीश सत्तेशी परिणामांची पर्वा न करता त्यांनी झुंज दिली.एका सधन.संपन्न,समृध्द अशा अवध प्रांताची बेगम असताना परांगदा होऊन विपन्नावस्थेत रहाणे त्यांनी पसंत केले.त्यांचा हा त्याग आणि बलिदान इतिहास कधिही विसरणार नाही.भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ १० मे १९८४ रोजी ५० पैसे किंमतीचे पोष्टाचे तिकीट जारी केले.अशा या महान स्वातंत्र्य सेनानी बेगम हजरत महाल यांच्या कतृत्वाचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**पूर्ववृत्तांत :-** बेगम हजरत महाल यांचा जन्म १८२० मध्ये फैजाबाद मधील एका गरीब कुटूंबात झाला.त्यांचे मुळ नांव इफ्तिखारन्निसा होते. मुहम्मदीखानम असे त्यांचे मुळ नांव होते.असाही उल्लेख आढळतो.सेविका म्हणुन अवधच्या राजकुटूंबात त्यांचा प्रवेश झाला. त्यांचे सौंदर्य व गुण पाहुन नबाब वाजिद अली शाह यांनी त्यांच्याशी विवाह केला.लग्नानंतर नबाबाने त्यांचे नाव महक परी असे ठेवले.सुंदरता व बुध्दीमत्ता यांचे मिश्रण महक परी मध्ये होते.त्यांनी बिरजीस कादर या मुलाला जन्म दिला त्यानंतर नबाबाने त्यांना बेगम हजरत महाल ही उपाधी दिली.याच नांवाने त्या इतिहासप्रसिध्द आहेत.

**प्रास्ताविक-अवध चा संक्षिप्त इतिहास :-** तुलसीदास यांच्या रामचीरतमानस मध्ये सर्वप्रथम अवध हा शब्दप्रयोग आढळतो.अकराव्या शतकात पूर्व भारतातील पाली,प्राकृत साहित्यात अयोध्याचा उल्लेख उज्झह,अउज्झह आणि अवच्झा असा आढळतो.भारतात बाराव्या शतकात जेव्हा मुस्लिमांचे आगमन झाले,तेव्हा या शब्दांच्या उच्चारात बदल होऊन ते क्रमशः अयुध्या,अवध्या असे बनले.लोदी शासन काळात (१४५१-१५२५) या शब्दांचा उच्चार अउध,औध असा झाला. मुघल काळात फारसी ही प्रशासकीय भाषा बनली. या काळात अउध,औध चा उच्चार अवध,औध असा केला जाऊ लागला.सम्राट अकबराने या क्षेत्राला,ज्यात आजही प्रामुख्याने अवधी भाषा बोलली जाते,आपल्या साम्राज्याच्या प्रांताच्या यादीत अवध या नावाने समाविष्ठ केले.अशाप्रकारे अयोध्याचे अवध होण्याची प्रक्रिया भाषाशास्त्राची एक प्रक्रिया होती आणि एका शहराचे नांव संपूर्ण क्षेत्राला,प्रांताला देण्याची प्रक्रिया एक प्रशासकीय निर्णय होता.कवी गोस्वामी तुलसीदास यांनी सर्वप्रथम अयोध्याचा उल्लेख साहित्यामध्ये अवध असा केला.[१]

अवधच्या नबाब घराण्याचा मुळ पुरुष सादतखान होता.१७२२ मध्ये त्याला अवधची सुभेदारी मिळाली.त्याचे मुळ नांव मोहम्मद अमीन होते.मुघल सम्राट मुहम्मद शाह याने त्याला ९ ऑक्टोबर १७२० मध्ये सआदत खान बुर्हान उल मुल्क ही उपाधी आणि १७२२ मध्ये अवधची सुभेदारी दिली.१९ मार्च १७३९ रोजी सादतखान चा मृत्यु झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा जावई सफदरजंग अवधचा सुभेदार बनला.त्याचे मुळ नांव अब्दुल मन्सुरखान असे होते.सुभेदारपदावर नियुक्त करताना मुघल सम्राटाने त्याला सफदरजंग ही उपाधी दिली होती.१७४८ मध्ये मुघल सम्राट अहमद शाह याने त्याला आपला वजीर बनविले व अवध मधील सुभेदारी प्रथा संपुष्ठात आणुन नबाबी प्रथा सुरु केली.येथुन पुढे अवधचा सुभेदार नबाब-वजीर या संयुंक्त नांवाने ओळखला जाऊ लागला.५ ऑक्टोबर १७५४ रोजी त्याचा मृत्यु झाला.त्यानंतर त्याचा उत्तराधिकारी मिर्झा जलालुद्दीन हैदर हा शुजाउद्दोला या नांवाने गादीवर बसला.याच्याच काळात बक्सारची प्रसिध्द लढाई झाली.या लढाईत नबाबाने ईस्ट इंडिया कंपनीच्या विरुध्द भाग घेतला होता.पण त्याचा पराभव झाला. नबाबाच्या वाढत्या शक्तीवरील हा फार मोठा आघात होता.२६ ऑगष्ट १७६५ च्या अलाहाबाद च्या तहाने नबाब इंग्रजांच्या बंधनात अडकला.या तहाने इंग्रजांना अवध मध्ये करमुक्त व्यापार करण्याची मुभा मिळाली.युध्दखंडणी म्हणुन इंग्रजांनी नबाबाकडुन ५० लाख रु.घेतले. कुरा व अलाहाबाद हे प्रांतही नबाबाच्या ताब्यातुन गेले.नबाबाला अवधमध्ये इंग्रजांची खडी फौज ठेवावी लागणार होती .त्याचा खर्च नबाबाला करावा लागणार होता.तो प्रति ब्रिगेड दोन लाख दहा हजार रुपये होता.या तहाने अवध दरबारात ब्रिटीश रेसिडेन्ट नियुक्त केला गेला.मिडल्टन हा अवध दरबारात नियुक्त होणारा पहिला रेसिडेन्ट होता.याशिवाय कंपनीच्या परवानगी शिवाय अवधचा नबाब

कोणत्याही युरोपियन व्यक्तिची नियुक्ति आपल्या दरबारात करु शकणार नव्हता तसेच कोणत्याही युरोपियन सत्तेची मदत घेऊ शकणार नव्हता. येथुन पुढे अवधची आर्थिक डबघाई सुरु झाली.प्रशासनात कंपनीचा हस्तक्षेप सुरु झाला.२९ जानेवारी १७७५ रोजी नबाब शुजाउद्दौला मरण पावला.त्यानंतर त्याचा मुलगा आसफउद्दौला अवधचा चौथा नबाब व तिसरा वजीर म्हणुन गादीवर बसला.३ मार्च १७७५ राजी लॉर्ड हेस्टींग्ज ने त्याच्याबरोबर करार केला व त्याच्याकडे १५ लाख रुपये खंडणीची मागणी केली.पण आपण याबाबत असमर्थ असल्याचे नबाबाने कळविले तेव्हा अवधच्या बेगमांकडुन हा पैसा वसुल करण्याचे हेस्टींग्ज ने ठरविले.१७७५ मध्ये त्याने अवधच्या बेगमांकडुन एकदा २५ लाख रु. व दूसऱ्यांदा ३० लाख रु.घेतले.यानंतर आपण पैशाची मागणी करणार नाही असा करार ही केला.पण १७८१ मध्ये हेस्टींग्ज ने बेगमांची जहागिरी व संपत्ती जप्त करण्याचा आदेश दिला.त्यानुसार बेगमांना कैद करण्यात आले.१७८२ मध्ये सुमारे वर्षभर त्यांचा छळ करुन त्यांच्याकडुन एक कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वसुल केली.

नबाब आसफउद्दौला रसीक होता.कला आणि स्थापत्य कलेला त्याने उदार आश्रय दिला होता.जिसको न दे मौला,उसको दे आसफउद्दौला ही म्हण त्यावेळी प्रसिध्द होती यावरुन त्याच्या दानशुरतेची कल्पना येते.१७८९ मध्ये लखनौ येथे त्याने इमामबाडा नांवाची सुंदर व आकर्षक इमारत बांधली.तिचे प्रवेशद्वार इस्तंबुल येथील खलीफांच्या भव्य मशिदीच्या प्रवेशद्वारासारखे आहे.मार्टीनिए नांवाचे विद्यामंदिर ही त्यानेच बांधले त्यासाठी एक कोटी रु.खर्च केले.[२] याच्याच काळात लखनौ चे महत्व वाढले व फैजाबादच्या जागी लखनौ अवधची राजधानी बनली.कंपनीने त्याच्यावर प्रतिब्रिगेड दोन लाख दहा हजार रुपये ऐवजी दोन लाख साठ हजार रुपये देण्याची अट लादली.मार्च १७९७ मध्ये कंपनीने आपल्या आणखी सैनिकी तुकड्या अवधमध्ये पाठविल्या.त्याचा पाच लाख पन्नास हजार रुपयांचा अतिरीक्त भार अवधवर पडला.२१ सप्टेंबर १७९७ रोजीनबाब आसफउद्दौला मरण पावला.त्यानंतर त्याचा मुलगा मिर्झा वजीर अली शाह नबाब बनला.पण कंपनी विरोधी विचारामुळे कंपनीने त्याला नबाब पदावरुन दूर केले आणि वार्षिक तनखा देऊन त्याला बनारस मध्ये ठेवले.मिर्झा वजीर अली च्या जागी नबाब आसफउद्दौलाचा भाऊ सादतअली खान याला नबाब बनविले.२१ जानेवारी १७९८ रोजी सर जॉन शोअर ने नबाब सादतअली खान बरोबर नवा करार केला.पूर्वी ५० लाख रुपये असणारी खंडणी ७६ लाख रुपये केली.अलाहाबादचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला.कंपनीचे १०००० सैनिक कायमचे अवधमध्ये रहाणार होते.नबाबाने परराज्याशी संबध ठेऊ नये असे बंधन त्याच्यावर घालण्यात आले.या तहाबध्दल इग्लंडमध्ये त्याचे कौतुक होऊन त्याला लॉर्ड टेन्मथ हा किताब देण्यात आला.[३]-

१७९८मध्ये लॉर्ड वेलस्ली ग.ज. बनला.अफगाणीस्तानचा राजा झामनशाह भारतावर आक्रमण करेल या भितीने त्याने लखनौमध्ये २०००० ची फौज सेनापती क्रेग च्या नेतृत्वाखाली ठेवली व त्याच्या खर्चासाठी नबाबाकडे ५० लाख रुपयांची मागणी केली. इकडे बनारस मध्ये असलेला पदच्युत नबाब मिर्झा वजीर अली शाह बंड करेल म्हणुन त्याला कलकत्त्यास पाठविण्याचे वेलस्ली ने ठरविले.त्यासाठी रेसिडेंट चेरी ची नियुक्ती केली.पण नबाबाने त्याला ठार मारुन ब्रिटीशाविरुध्द बंड पुकारले (१४ जानेवारी १७९९). इंग्रज फौज त्याच्यावर चालुन गेली तेव्हा त्याने जयपूर राज्याचा आश्रय घेतला.पण इंग्रजांनी जयपूर च्या राजाला धमकी दिल्यानंतर त्याने नबाबाला इंग्रजांच्या स्वाधीन केले.वेलस्लीने त्याला कैद करुन कलकत्ता येथे ठेवले त्याच ठिकाणी त्याचा १८१७ मध्ये मृत्यु झाला.इकडे पैशासाठी इंग्रजांनी नबाब सादतअली खान कडे तगादा लावला.नबाबाने ५० लाख रुपये देण्यास असमर्थता दर्शविल्यावर लॉर्ड वेलस्लीने हेनरी वेलस्लीला पाठवुन नबाबाबरोबर पुन्हा नवीन करार केला.त्यानुसार कंपनीने नबाबाकडुन दूआब,गोरखपूर,रोहिलखंड हे प्रदेश घेतले.अवधची लष्करी संख्या १/१० ने कमी केली.कंपनीने प्रशासनात आपल्या एकनिष्ठ लोकांच्या नियुक्त्या केल्या.नबाब सादतअली खान हा अवधच्या बुध्दीमान आणि शक्तिशाली शासकांपैकी एक होता.त्याने जमीनदारांना आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न केला.१८०१ च्या तहानुसार आपले अर्धे राज्य गमावुनही त्याच्या पश्चात राजकोषात १४ कोटी रुपये शिल्लक होते.परंतु ब्रिटीशांच्या वाढत्या शक्तीला तो रोखु शकला नाही.त्याच्या काळात अवधचा सांस्कृतिक विकास मोठ्या प्रमाणात झाला.दिल्लीहुन आलेल्या अनेक कवी आणि साहित्यिकांना त्याने आश्रय दिला.मीर आणि सौदा ही त्याची उदाहरणे आहेत.१३ जुलै रोजी नबाब सादतअली मरण पावला.त्यानंतर गाजीउद्दीन अवधचा नबाब बनला.यावेळी अवधचे राज्य कंपनी सरकारच्या पुर्ण अधिपत्याखाली होते.अवधने मुघल दरबारशी संबंध तोडावा असे कंपनी सरकारला वाटत होते.त्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नबाबावर दबाव टाकला.त्याचा परिणाम म्हणजे नबाबाने मुघल दरबारशी संबंध तोडला आणि औपचारीकपणे आपल्या स्वतंत्रतेची घोषणा केली.अशा प्रकारे अजाणतेपणाने का होईना नबाबाने अखील भारतीय शक्तीच्या रुपात,मुघल साम्राज्याला आव्हान देणारी शक्ती म्हणुन उदयाला येणाऱ्या ब्रिटीश सत्तेचा मार्ग सुकर केला.कंपनीला अपेक्षित अशा घटना घडत होत्या.त्यानंतर कंपनीने नबाब आणि बादशहाला अपमानीत करणे सुरु केले.नबाब गाजीउद्दीन हैदर ने पादशाह (विश्वासासाठी लढणारा बादशाह) आणि शाहजमान (युगाचा शासक) या उपाध्या धारण केल्या पण त्याचा उत्तराधिकारी नबाब नासिरुद्दीन हैदर याला या पदव्या संकुचित करुन पादशाह-ए-अवध ( अवध चा बादशाह ) व शाह-ए-जहाँ (विश्वाचा शासक ) या पदव्या घेण्यास कंपनीने भाग पाडले.शाह-ए-जहाँ या पदवी वर ही कंपनी सरकारने पुढे आक्षेप घेतला.व ही पदवी फक्त घरगुती कार्यासाठीच वापरण्याची मुभा दिला.२० आक्टोबर १८२७ मध्ये नबाब गाजीउद्दीन हैदर मरण पावला व त्याचा पुत्र नासिरुद्दीन हैदर नबाब

बनला.त्याने लखनौला उद्यानांचे शहर बनविले.ठग,दरोडेखोरांचा बंदोबस्त केला.गुलाम प्रथेचा अंत केला.पण त्याचवेळी त्याचा राजकोषही रिकामा झाला. कंपनीने मात्र आपली तिजोरी भरली.अवध राज्यात अव्यवस्था निर्माण झाली.विद्रोही जमीनदार स्वतंत्र बनले.अवधची परिस्थिती दिवसेंदिवस ढासळू लागली.ही परिस्थीती पुढे नबाब मोहम्मद अली शाह,नबाब अमजदअली शाह,नबाब वाजीदअली शाह यांच्या काळातही चालु राहिली.

**अवधचे विलीनीकरण (१३ फेब्रुवारी १८५७)** :-लॉर्ड ऑकलंड च्या काळात १८३७ मध्ये कंपनीने अवधच्या नबाबाबरोबर नवीन तह केला.नबाब रोख रक्कम देऊ शकत नसल्याने त्याचा समृध्द प्रदेश ताब्यात घेतला जाऊ लागला.१८४७ मध्ये नबाब वाजिद अली शाह गादीवर बसला.त्यानंतर एका वर्षाने ग.ज. बनलेल्या लॉर्ड डलहौसीने भारतातील एकेक प्रदेश ताब्यात घेण्याचा सपाटा चालविला.त्यासाठी वेगवेगळे निकष ठरविले.विविध मार्गाने,कोणत्या ना कोणत्या निमित्ताने भारतातील एकेक प्रदेश ब्रिटीश साम्राज्याला जोडला जाऊ लागला.पण अवध खालसा करण्यासाठी डलहौसीजवळ कोणतेच नैमित्तीक कारण नव्हते.लखनौवर आक्रमण करता येत नव्हते कारण तेथील लोक ब्रिटीशांच्या कधीही विरोधी गेले नव्हते.नबाब स्नेहभावाने वागत नाही असा आरोप करणेही अशक्य होते.वारस नाही म्हणावे तर राजवाडा वारस संततीने सदैव गजबजलेला होता.दत्तक वारसाचाही प्रश्न नव्हता.अशाप्रकारे नबाबाचा कोणताच अपराध नव्हता.फक्त एकच अपराध होता की नबाबाच्या राज्यातील प्रदेश अतिशय सुपिक,सुंदर व संपन्न होता.[४]१८५४ मध्ये लॉर्ड डलहौसीने औट्रमची नेमणुक लखनौ रेसिडेन्सीवर केली.त्याने १८५५ मध्ये अव्यवस्थेच्या नांवाखाली लखनौचा ताबा घेण्याची शिफारस डलहौसीकडे केली.डलहौसीने नबाब वाजीदअली शाह याला नबाबपद व रोख रक्कम देऊन त्याचा सर्व प्रदेश ताब्यात घेण्याचा आदेश औट्रमला दिला.पण नबाब त्यास तयार नव्हता.तेव्हा डलहौसीने ७ फेब्रूवारी १८५७रोजी नबाबाचे सर्व राज्य खालसा करुन ते ब्रिटीश साम्राज्यात विलीन करण्याचा हुकूम सोडला.१३ फेब्रूवारी रोजी औट्रमने त्याची अंमलबलावणी केली.यासंदर्भात डलहौसीची भेट घेण्यास नबाब कलकत्त्यास गेला पण डलहौसीने त्याला तेथेच नजरकैदेत ठेवले.डलहौसीच्या भेटीला गेलेला नबाब लखनौला परत आलाच नाही.अयोध्येचे राज्य संपले.डलहौसीच्या या आदेशाने लोकक्षोभात भर पडली.पुर्वी समृध्दीत खेळणारे लोक अन्नास मोदात झाले.एका अयोध्या प्रांतात ८०००० लोक बेकार झाले असे नमुद आहे.गाण्याबजावण्याची व खाद्यपेयांची चंगळ क्षणमात्रात नाहीशी होऊन लोकास उपास पडुन ते हवालदिल बनले.[५] अवध राज्य ब्रिटीश साम्राज्यात विलीन झाले त्यावेळी अवध राज्यात पुढील बारा जिल्ह्यांचा समावेश होता.(१) उन्नाव (२)बहाराइच (३) प्रतापगढ (४) दरीयाबाद (५) रायबरेली (६) सुलतानपूर (७) सीतापूर (८) फैजाबाद (९) गोंडा (१०) लखनौ (११) लखीमपूर (१२) हरडोई.[६]

**१८५७ च्या उठावातील बेगम हजरत महाल यांचे योगदान :-** अवध खालसा केल्यापासुन तेथील प्रजेची दिवसेंदिवस दूर्दशा होऊ लागली.नबाबाच्या काळातील मोठमोठ्या मानाच्या,अधिकाराच्या जागेवर ब्रिटीशांच्या नेमणुका झाल्या.अवध प्रांताचा मुख्य अधिकारी म्हणुन सर हेनरी लॉरेन्स याची नियुक्ति करण्यात आली.पंजाबमध्ये ज्याने उठाव मोडुन काढला त्या सर जॉन लॉरेन्सचा हा मोठा भाऊ होता.त्याने अवधच्या सातव्या रेजिमेंट ला निशस्त्र केले.१२ मे १८५७ रोजी राजनिष्ठा दाखविणाऱ्या हिंदी सैनिकांना बक्षिसे दिली.दूसऱ्या दिवशी त्याला मिरत मध्ये उठाव झाल्याची व १४ मे ला दिल्ली स्वतंत्र झाल्याची बातमी समजली. १८५७ च्या उठावाचे पडसाद अवधमध्येही उमटले.नबाब वाजीदअली शाह यांचा अकरा वर्षाचा पुत्र बिरजीस कादर याला गादीवर बसविण्यात आले.तो अल्पवयीन असल्याने त्याच्या वतीने त्याची आई बेगम हजरत महाल राज्यकारभार पाहु लागल्या.७ जुलै १८५७ रोजी अवध चे राज्य बेगम हजरत महाल यांच्या ताब्यात आले.३० मे १८५७ रोजी अवधच्या ७१ व्या पायदळ पलटणीने उठाव केला.यात लगेच लखनौमधील ४८ वी पायदळ व घोडदळाची सातवी रेजिमेंट उतरली.यावेळी झालेल्या चकमकीत लेफ्टनंट ग्रँट,लेफ्टनंट हार्डीग्ज,ब्रिगेडियर हर्डस्कोम ठार झाले.[७]

३१ मे उठावाची तारीख ठरली असताना १० मे रोजी मिरत मध्ये अचानक उठाव झाला.परंतु राणीने अवधमध्ये ३१ मे पर्यंत संयम ठेवला.३० मे च्या रात्री तोफा वाजवुन विद्रोहाची घोषणा करण्यात आली.लखनौमधील देशी सैनिकांच्या तुकड्या बेगमेच्या झेंड्याखाली एकत्र आल्या.लखनौनंतर अवधमधील इतर परिसरही क्रांतीकारकांनी स्वतंत्र केला.बेगम हजरत महाल यांनी केलेली उठावाच्या योजनांची अंमलबजावणी इतर कोणत्याही क्रांतीनेत्यांपेक्षा निर्दोष व सुव्यवस्थित होती.[८] १८५७ मध्ये नियोजीतवेळी उठाव घडवुन आणुन संपुर्ण प्रांत स्वतंत्र केल्याची घटना अवध येथेच आढळते.याचे श्रेय अवधची राणी बेगम हजरत महाल यांच्याकडे जाते.अवघ्या दहा दिवसात अवधचे विशाल साम्राज्य परत मिळविणाऱ्या बेगमेचे संघटन कौशल्य,नेतृत्वगुण अभूतपूर्व होते.युध्द कौशल्याबरोबरच बेगमेच्या शुध्द नैतिक आचरणाचा सर्वच इतिहासकारांनी निर्विवाद प्रशंसा केली आहे.[९]बिरजीस कादरला नबाब पदावर बसविल्यानंतर अवधचे मंत्रीमंडळ बनविण्यात आले.शरफुद्दौला महामंत्री बनला.फडनिशी खाते महाराजा बालकिशन यांच्याकडे सोपविण्यात आले.माजी नबाबशाहीत हे दोघे याच पदावर होते.मम्मुखानाला न्यायखाते मिळाले.राजा जसलालसिंग हा युध्दखात्याचा प्रमुख बनला.मुजफ्फरअली,मीर मेहंदी,रिसालदार कासिमखान हे सेनाधिकारी निवडले गेले. [१०] अवधचा दरबार नित्यनेमाने भरविला जात असे व त्या दरबारात बेगम हजरत महाल स्वतः उपस्थित रहात असे. अयोध्या प्रांत स्वतंत्र होऊन ब्रिटीश राजसत्तेचा तेथे लवलेशही उरलेला नाही ही वार्ता बेगमेच्या सही शिक्क्यानिशी दिल्लीच्या बादशहाकडे नजर नजराण्यासह धाडण्यात

आली.आजुबाजुंच्या सर्व जमीनदार,मांडलीक राजांना लखनौला येण्याविषयी पत्रे पाठविण्यात आली.निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या झालेल्या नेमणूका,राजव्यवस्थेच्या सर्वांगाची केलेली व्यवस्था,दररोज राजसभेचे भरणारे दरबार वगैरे प्रकारावरुन अयोध्येतील बंडाचे बंडखोरपण संपुन त्याला राजकत्वाचे संघटन प्राप्त झाले असे सर्वत्र दिसु लागले.[११]

. लखनौमधील इंग्रज स्त्री-पुरुषांनी रेसिडेन्सीचा आश्रय घेतला.क्रांतीकारकांनी त्याला वेढा दिला.२० जुलै १८५७ रोजी क्रांतीकारकांनी रेसिडेन्सीवर हल्ला केला.पुढे अशा लहान मोठ्या चकमकी क्रांतीकारक व इंग्रजामध्ये होत राहिल्या.सर हेनरी लॉरेन्स ठार झाल्यानंतर मेजर बॅक्स अवधचा चिफ कमीशनर बनला.तो ठार झाल्यानंतर ब्रिगेडियर इंग्लिस याने चार्ज घेतला.२३ सप्टेंबर रोजी हॅवलॉक आलमबागेत येऊन पोहोचला.क्रांतीकारकांच्या हल्ल्यांना तोंड देत देत तो रेसिडेन्सीकडे निघाला.मार्गात ज.नील ठार झाला.गेल्या ८७ दिवसांपासून ब्रिटीश रेसिडेन्सी मधील लढणारे सुमारे ७०० इंग्रज ठार झाले होते.तर सुमारे ५०० युरोपियन व ४०० नेटिव्ह जिवंत होते.या लोकांच्या मुक्ततेसाठी निघालेल्या हॅवलॉकच्या सैनिकांतील ७२२ लोक रेसिडेन्सीत पोहचेपर्यंत ठार झाले.एवढी जबरदस्त किंमत मोजल्यानंतर ब्रिटीशांना लखनौचा विजय मिळाला.पण हा विजय अधिककाळ टिकला नाही.क्रांतीकारकांनी पुन्हा लखनौला वेढा दिला.ही बातमी समजताच सर कॉलीन कॅम्बेल २७ ऑक्टोंबर रोजी कलकत्त्याहुन लखनौकडे निघाला.तत्पूर्वी ब्रिगेडियर ग्रँट लखनौमध्ये आला.कॉलीन कॅम्बेल त्याला ९ नोव्हेंबर रोजी येऊन मिळाला.१४ नोव्हेंबर रोजी त्यांनी लखनौवर हल्ला केला. यावेळी सिकंदर बागेत झालेल्या चकमकीत २००० क्रांतीकारी ठार झाले.[१२] यावेळी रणांगण सोडून जाणाऱ्या सैनिकांना बेगम हजरत महाल यांनी रोखुन धरले. घ्माझे डोके तोडुन मग तुम्ही हवे तिकडे जा असे आवेशपूर्ण उद्‌गार त्यांनी यावेळी काढले.बेगमेचा हा आवेश पाहुन सैनिक पुन्हा मोठ्या त्वेषाने लढु लागले.कॅम्बेलने लखनौ सोडताच बेगमेने अलाहाबाद,बनारस जिंकुन आझमगढ,जौनपूर वर चालुन जावे असे ठरले,[१३] आलमबागेत औट्रम बरोबर ज्या लढाया झाल्या त्यापैकी २५ फेब्रूवारी १८५८च्या लढाईत बेगम हजरत महाल शिपायांना प्रोत्साहन देण्यासाठी हत्तीवर बसुन रणांगणात आल्या होत्या असा उल्लेख इंग्रजी कागदपत्रात आढळतो.मार्च १८५८मध्ये कॅम्बेल ने लखनौ चा ताबा घेतला.तेव्हा बेगम हजरत महाल शहरातच होत्या.बेगमकोठी नांवाच्या इमारतीसाठी इंग्रजांना क्रांतीकारकांशी तुंबळ युध्द करावे लागले.त्याचे श्रेय बेगमेला दिले जाते.[१४] यावेळी कॅम्बेलजवळ ३१००० सैन्य व१८० तोफा होत्या.६मार्च ते १५ मार्च १८५८ या काळात लखनौमध्ये घनघोर लढाई झाली. १० मार्च ला ब्रिटीश सेनानी हडसन ठार झाला यानेच दिल्लीच्या मुघल राजपुत्रांना ठार मारले होते.हॅवलॉक तर यापूर्वीच ठार झाला होता.१४ मार्च ला ब्रिटीश फौज लखनौच्या राजवाड्यात घुसली. २१ मार्च रोजी लखनौचा ताबा ब्रिटीशांना मिळाला. बेगम हजरत महाल यांना लखनौ सोडावे लागले.पण त्यांना हिम्मत सोडली नाही.आपल्या सैनिकांच्या नांवे त्यांनी एक आदेश काढला. घ्मोकळ्या मैदानात शत्रुंचा सामना करु नका.नदीच्या घाटावर पहारा द्या.शत्रुंचे संदेश रोका.रसद तोडा.त्यांची ठाणी नष्ट करा.फिरंग्यांना उसंत मिळू देऊ नकाङ.असे त्या आदेशात म्हटले होते.

अशा रितीने अवधच्या उठावाचा अंत झाला.आपल्या स्वातंत्र्यासाठी अयोध्येतील जनता प्राणपणाने लढली.आपल्या देश स्वातंत्र्यासाठी इतक्या हटेल पराक्रमाने झुंजत राहिलेला देश जगाच्या पाठीवर दूसरा कोणताही नसेल.मॅलेसन म्हणतो-अयोध्येने जितका निश्चयात्मक,दिर्घकालीन लढा दिला,तितका हिंदुस्थानातील दूसऱ्या कोणत्याही भागाने दिला नाही.[१५] जुन १८५७ पासुन मार्च १८५८ पर्यंत अनेक इंग्रज सैनिकांच्या तुकड्या अवधवर चाल करुन गेल्या पण बेगमेच्या एकसंघ नेतृत्वामुळे मोठमोठ्या इंग्रज सेनापतींना प्राणास मुकावे लागले.अखेरच्या प्रतिकार युध्दात अयोध्योतील प्रत्येक खेड्याने,खेड्यातील जनतेने लखनौकडे जाणाऱ्या इंग्रज फौजांशी मुकाबला केला.बेगमेने योजनापूर्वक पंडीत,मौलवी यांच्याकरवी केलेल्या क्रांतीच्या प्रचारामुळेच हे घडुन आले.[१६] बेगमेसाठी अयोध्येतील जनता मरण्यासही तयार होती.अयोध्येतील सामान्य स्त्रियांनीही युध्दात हिरीरीने भाग घेतला.सिकंदरबागेतील युध्दात कितीतरी स्त्रिया मारल्या गेल्या.त्यांच्या मृत्युनंतर त्या स्त्रिया आहेत हे आम्हाला समजले असे गार्डन अलेक्झांडर या अधिकाऱ्याने म्हटले आहे.याच युध्दात एका स्त्रीने पिंपळाच्या झाडावर चढुन अनेक इंग्रजांना मारले होते.म्हणुन जरी लखनौ शहर हातचे गेले तरी हिंदी स्त्रियांच्या शौर्याने भारतीय इतिहासात काही सोनेरी पानांची भर पडली असे आनंद स्वरुप मिश्रा यांनी म्हटले आहे.[१७] लखनौमध्ये स्त्रियाही इंग्रजांशी पुरुषांइतक्या खंबीरपणे लढत होत्या.मरुन पडेपर्यंत त्या स्त्रिया की पुरुष याचे ज्ञान इंग्रजांना झाले नव्हते.या स्त्रिया बेगमेसाठी लढत होत्या.[१८]

अयोध्येतील अनेक तालुकेदारांना उठावात सहभागी झाले होते.त्यांना आळा घालण्यासाठी लॉर्ड कॅनिंगने ३१ मार्च १८५८ रोजी जाहिरनामा काढुन अवध प्रांतातील तालुकेदारांच्या जमीनी जप्त केल्या.जे राजनिष्ठ रहातील त्यांना त्यांच्या जमिनी परत दिल्या जातील असे आश्वासन देण्यात आले.तरीही अयोध्येतील उठावाची व्याप्ती जास्तच राहिली.इतर ठिकाणचे उठाव ब्रिटीशांनी मोडून काढले तरीही अयोध्येतील उठाव चालुच होता.शहाजहानपूरला बेगमेने इंग्रजांना बरेच दिवस रोखुन धरले. इतर ठिकाणी जेव्हा क्रांतीकारक पुढाऱ्यांना पराभव पत्करावा लागला तेव्हा ते पुढारी बेगम हजरत महाल यांच्या संघटीत उठावामुळे अयोध्येत एकत्र आले.थोड्याच अवधीत नानासाहेब व बाळासाहेब पेशवे,राजबक्ष, बहुनाथसिंह,भूपालसिंह,राणा बेनीमाधव,जगराजसिंह इ. नेते अयोध्येत एकत्र आले.बेगमेच्या नेतृत्वाखाली पुन्हा त्यांची

शक्ती वाढली.[१९] अवध प्रांताच्या स्वातंत्र्याची योजना आखुन बेगम हजरत महाल यांनी सतत दोन वर्षे इंग्रजाच्या हल्ल्यांना तोंड दिले.उठावाच्या अखेरच्या पर्वात तर अवध येथे सर्व क्रांतीकारी पुढारी गोळा झाले व अवध क्रांतीचे केंद्र बनले.[२०] शहाजहानपूरच्या लढाईत दिल्लीच्या फिरोजशहांचाही उल्लेख आढळतो.१ नोव्हेंबर १८५८ रोजी राणीचा जाहिरनामा प्रसिध्द झाला. घ्येथुन पुढे कोणताही प्रदेश खालसा केला जाणार नाही.कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत.एवढेच नव्हे तर ज्यांनी उठावात भाग घेतला.त्यांना सार्वजनीक माफी देण्यात येईल.त्यांच्याकडे सुडबुध्दीने पाहिले जाणार नाही.सर्वांना समान वागणुक देण्यात येईलङ असे आश्वासन व्हिक्टोरीया राणीने या जाहिरनाम्यात दिले होते.अनेकांनी या जाहिरनाम्याचे स्वागत केले पण बेगम हजरत महाल यांनी त्याला विरोध केला.एवढेच नव्हे तर ३१ डिसेंबर १८५८ रोजी नेपाळहून आपला प्रतिजाहिरनामा प्रसिध्द केला. इंग्रज लोक अत्यंत दीर्घद्वेषी आहेत.ते आता काहीही म्हणत असले तरी कधीच काही विसरत नाहीत.महाराणीला येथील लोंकांसबधी खरोखरच इतकी आस्था वाटत असेल तर हिंदुस्थानी लोकांच्या इच्छेला मान देऊन तिने हा देश आपल्या स्वाधीन करण्याची तयारी दर्शवली पाहीजे.देशी लोकांना रोजगार देण्याची मायावी भाषा महाराणीने वापरली आहे.जे काम इंग्रज लोक करणार नाहीत तेच इथल्या लोकांकडे सोपविले जाईल.रस्त्यावर खडी पसरणे किंवा कालव्यासाठी खड्डे खोदणे अशी कष्टाची कामे इथल्या लोकांना दिली जातील.आपल्या धर्माच्या रक्षणासाठी इथल्या लोकांनी उठाव केला.त्यात लाखो लोक मरण पावले.पुन्हा आपली पूर्वीसारखी फसवणुक होऊ नये असे वाटत असेल तर आत्ताच सावध व्हा.[२१] बेगम हजरत महाल यांच्या या प्रतिजाहिरनाम्यामुळे व्हिक्टोरीया राणीच्या गोंडस भाषेच्या बुरख्याआड दडलेल्या ब्रिटीशांच्या कुटील राजनीतीच्या चिंधड्या उडविल्या.याचा परिणाम म्हणुन अयोध्येमध्ये प्रतिकाराची भावना पुन्हा जागृत झाली.बेगमेच्या प्रतिजाहिरनाम्यामुळे क्रांतीच्या नेत्यांनी आपले नेतृत्व बेगम हजरत महाल यांच्याकडे सोपविले होते हे सिध्द होते असे डॉ.मुनघाटे म्हणतात.बेगमेने ब्रिटीश सत्तेशी केवळ लष्करीच नव्हे तर बौध्दिक झुंजही दिली असेही ते पुढें म्हणतात.[२२] आम्हास साम्राज्यविस्तार करायचा नाही या राणीच्या जाहिरनाम्यातील आश्वासनावर आक्षेप घेत-घ्मग आतापर्यंत ज्यांची राज्ये ताब्यात घेतली त्यांची त्यांना परत का करत नाहीङ असा प्रतिप्रश्नही बेगम हजरत महाल यांनी विचारला.१ जानेवारी १८५९ पुर्वी गावोगावच्या पाटलांनी आपल्या छावणीत येऊन हजेरी द्यावी असा आदेशही बेगम हजरत महाल यांनी काढला होता.[२३]बेगम हजरत महाल शरण आल्यास त्यांना त्यांच्या योंग्यतेला साजेशा बहुमानाने वागविण्यात येईल असे इंग्रजांनी जाहीर केले होते.तशी तयारी ब्रिटीशांनी दर्शवली होती.पण बेगम हजरत महाल यांनी तसे केले नाही.प्रा.न.र.फाटक म्हणतात- इंग्रजांना शरण जाण्याचे टाळुन बेगमेने स्वाभिमान राखला.[२४] बेगम हजरत महाल यांच्या अनेक अधिकाऱ्यांचे मत तसेच होते.सय्यद मुहम्मद खान हा नबाब वाजीदअली शाह यांचा नजीम होता.उठावात तोही हिरीरीने लढत होता.शरणागती स्विकारण्याबाबत त्याला इंग्रज अधिकाऱ्याकडुन सांगण्यात आले.तेव्हा तो उद्‌गारला - घ्कंपनी सरकारने आमच्या लोकांवर सतत अन्यायच केला आहे.अशा सरकारच्या राष्ट्रावर विश्वास ठेवणे मुर्खपणाचे आहे.आम्ही स्वतःला अयोध्येच्या राजाचे प्रजाजन मानतो.त्यामुळे अयोध्येमध्ये घुसलेल्या आक्रमकांना पिटाळुन लावणे हेच आमचे कर्तव्य ठरते.अयोध्येच्या राजघराण्याशिवाय आम्ही कुणालाच ओळखत नाही. [२५]

ब्रिटीशंविरुध्द उठाव करण्याची व शरणागती न स्विकारण्याची फार मोठी किंमत बेगम हजरत महाल यांना मोजावी लागली.अवध सारख्या अतिसंपन्न,सधन व समृध्द प्रांताची राणी असलेल्या बेगम हजरत महाल यांना आपला पुत्र नबाब बिरजीस कादर यांच्यासह अतिशय हलाखीच्या अवस्थेत उर्वरीत जीवन कंठावे लागले.नेपाळचा राजा राणा जंगबहादुर इंग्रजांचा मित्र होता.त्याने बेगम यांना आश्रय देण्यास नकार दिला.तरीही त्याच्या धमक्यांना न घाबरता बेगम नेपाळमध्येच राहिल्या.तेथेच त्यांचा १८७९ मध्ये मृत्यु झाला.कृष्णमोहन म्हणतातः- She suffered defeat but did not surrender honour.She refused the pension offered to her and chose to die unmourned in foreign landछ [२६] त्यांच्या स्मरणार्थ भारत सरकारने १० मे १९८४ रोजी पोस्टाचे तिकीट जारी केले.[२७] १८५७ च्या उठावात बेगम हजरत महाल यांचे योगदान मोठे आहे.देशासाठी वाटेल तो त्याग व त्रास त्यांनी सहन केला पण ब्रिटीशांची माफी मागीतली नाही.उठावादरम्यान त्यांनी काही काव्यपंक्ती लिहल्या होत्या असे मो.फरीश मन्सुरी म्हणतात.त्यांनी त्या काव्यपंक्ती १८५७ मतहान स्वतंत्रता संग्राम या ग्रंथात प्रसिध्द केल्या आहेत.[२८] त्या पुढीलप्रमाणे.

साथ दूनियाने दिया और न, मुकद्दरने दिया — रहते जंगल ने कब दिया जो, शहर ने न दिया
एक तमन्ना थी की आझाद, वतन हो जाए — जिसने जीने न दिया चैन से ,मरने न दिया
जमीं की आग बुझाने ये घटा, उमडी थी — हाँ,मगर उल्टी हवाओं ने, ठहरने न दिया
बिखर चला वो काफिला, मकामे बौडी से — चाल दुश्मन की कुछ ऐसी, उभरने न दिया
जुल्म की आँधियॉ बढती रही, लम्हा लम्हा — फिर भी परचम को आसमा से,उतरने न दिया।

**समारोप :-**बेगम हजरत महाल यांच्या नेतृत्वाखाली अवध प्रांतात ब्रिटीशांविरोधात सुनियोजित,सुव्यवस्थित लढा दिला गेला.त्यांच्याकडे नेतृत्वगुण होते.आपल्या ११वर्षाच्या मुलाला गादीवर बसवुन त्यांनी राज्यकारभार चालविला.राज्याच मंत्रीमंडळ

नियुक्त केले.त्यांच्याकडे मुत्सद्दीपणाही होता.बाहेरुन येणाऱ्या ब्रिटीश फौजांना रोखण्यासाठी त्यांनी मोठी तयारी केली.लखनौचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी लखनौभोवती खंदक खोदण्याचा निर्णय घेतला.त्यासाठी पाच लाख रुपये मंजुर केले.प्रत्यक्ष मैदानात उपस्थीत राहुन त्यांनी आपल्या सैनिकांना प्रोत्साहन दिले.राज्यकारभारासाठी विविध खात्यांची निर्मीती करुन त्यावर कार्यक्षम व्यक्तिंच्या नियुक्त्या केल्या.त्यांच्या नियमित बैठका घेतल्या जात होत्या.त्या बैठकांना व नित्यनेमांनी भरणाऱ्या दरबारात बेगम हजरत महाल उपस्थित रहात.मुत्सद्दी बेगम हजरत महाल एक आदर्श व्यक्तिही होती.याचे प्रत्यंतर ब्रिटीशांनाही आले.कैसर बागेत त्यांच्या ताब्यात कैद केलेले अनेक इंग्रज,स्त्री.पुरुष,मुले होती.लखनौचा पाडाव होताच त्यांना आमच्या ताब्यात द्या असा आग्रह हिंदी शिपायांनी धरला.पण बेगम हजरत महाल यांनी इंग्रज स्त्रिया व मुलांचे रक्षण केले.स्वातंत्र्य युध्दात त्यांनी जो सभ्यपणाचा व माणुसकीचा आदर्श घालुन दिला त्याच्या उलट इंग्रजांचे वर्तन होते.अवध प्रंतात बेगम हजरत महाल लोकप्रिय होत्या.अयोध्येमध्ये कितीतरी काळपर्यंत त्यांची गौरवपर गीते प्रचलीत होती.यावरुन सर्वसामान्य जनतेत त्या किती लोकप्रिय होत्या याची कल्पना येते.[२९]भारतातील सर्व ठिकाणचे उठाव संपुष्टात आले असताना तत्कालीन जगातील बलाढ्य ब्रिटीश सत्तेशी एका ३७ वर्ष वयाच्या मुस्लीम स्त्रीने परिणामांची पर्वा न करता लढा देणे ही सामान्य बाब नव्हती.पद्मश्री डॉ.भरत मिश्र म्हणतात. आज भी उनकी कब्र उनके त्याग और बलीदान का स्मरण करती है ।[३०]

**निष्कर्ष** :-१८५७ च्या उठावात बेगम हजरत महाल यांचे योगदान मोठे आहे.अवधच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटीश सत्तेशी त्यांनी प्राणपणाने संघटीत लढा दिला.देशाच्या इतर ठिकाणचे लढे अपयशी ठरत असताना अवधचे यश उठुन दिसत होते.इतर ठिकाणचे उठाव मोडुन ब्रिटीशांनी आपली संपूर्ण शक्ती अवध मध्ये एकवटली.मोठमोठ्या ब्रिटीश सेनानींना अवधमध्ये यावे लागले आणि आपल्या प्राणास मुकावे लागले.आपल्याशी एकनिष्ठ राहिल्यास आपण माफी देऊ असे ब्रिटीशांनी जाहीर केले तरी अवधवासियांनी ब्रिटीशांच्या या आवाहनाला दाद दिली नाही.शरण आल्यास बेगम हजरत महाल यांना त्यांच्या योग्यतेला साजेसा बहुमान दिला जाईल असे आश्वासन ब्रिटीशांनी देऊनही बेगम हजरत महाल यांनी शरणागती पत्करली नाही.आणि आपला स्वाभिमान दाखविला.एवढेच नव्हे तर इतर ठिकाणच्या क्रांतिकारकांनाही आश्रय दिला. ब्रिटीशांनी देऊ केलेली पेन्शन नाकारली.आणि अत्यंत हलाखीच्या अवस्थेत आपले उर्वरित आयुष्य सर्वसामान्याप्रमाणे व्यतित केले.फार मोठे ऐश्वर्य पायाशी लोळण घेत असताना बेगम हजरत महाल यांनी त्याकडे पाठ फिरवुन विपन्नावस्थेत रहाणे पसंत केले.

संदर्भ :-(१) गिरीशकुमार सिंह (२००७),अवधका सामाजिक,आर्थिक,व सांस्कृतिक इतिहास (१७७५-१८३७ ई.),राधा पब्लीकेशन.नवी दिल्ली.पान.३
(२) सरदेसाई गोविंद सखाराम,(१९३९).ब्रिटीश रियासत (उत्तरार्ध),केशव भिकाजी ढवळे प्रकाशन,मुंबई,पान.१९२
(३) कित्ता,पान.२१५.
(४) सावरकर वि.दा.(१९९०),१८५७ चे स्वातंत्र्यसमर,मनोरमा प्रकाशन,मुंबई,पान ४६.
(५)सरदेसाई गोविंद सखाराम,(१९३९).उपरोक्त,पान ४७३. (६)गिरीशकुमारसिंह (२००७),उपरोक्त,पान.७३.
(७) सावरकर वि.दा.(१९९०),उपरोक्त,पान.१९५.
(८) मुनघाटे डॉ.प्रमोद,(१९९४),अठराशे सत्तवन-सत्य आणि कल्पित,विजय प्रकाशन,नागपूर,पान ९१.
(९) कित्ता,,पान.९०. (१०) फाटक न.र.,(१९५८),अठराशे सत्तावनची शिपाई गर्दी,चित्रशाळा प्रकाशन,पुणे,पान २३३
(११)सावरकर वि.दा.(१९९०),उपरोक्त,पान.२८१. (१२) कित्ता, ,पान.२९४.
(१३) फाटक न.र.,(१९५८),उपरोक्त,पान ३६१. (१४) कित्ता,
(१५) सावरकर वि.दा.(१९९०),उपरोक्त,पान.४०६. (१६) मुनघाटे डॉ.प्रमोद,(१९९४),उपरोक्त,पान.९२.
(१७) कित्ता,,पान १०८. (१८) फाटक न.र.,(१९५८),उपरोक्त,पान २२९.
(१९) मुनघाटे डॉ.प्रमोद,(१९९४),उपरोक्त,पान ९२. (२०) कित्ता,पान ९१.
(२१) वाळिंबे वि,स.,(१९९७),सत्तावन ते सत्तेचाळीस,राजहंस प्रकाशन,पुणे, पान २२५.
(२२) मुनघाटे डॉ.प्रमोद,(१९९४),उपरोक्त,पान.९३. (२३) फाटक न.र.,(१९५८),उपरोक्त,पान ३६१.
(२४) कित्ता,पान ३६२. (२५) वाळिंबे वि,स.,(१९९७), पान २२५.
(२६) Krishna mohan (२००६),Revolt of १८५७ and the Indian Feeedom Movement,Book Inclave,Jaipur,Page ११८.
(२७) WWW.google.Com/Begum Hazarat Mahal/Wikipedia
(२८) मो.फरीश मन्सुरी,(२००६),१८५७ महान स्वतंत्रता संग्राम,ओमेगा पब्लिकेशन,दिल्ली,पान २१३.
(२९) मुनघाटे डॉ.प्रमोद,(१९९४),उपरोक्त,पान.९३.
(३०) मिश्र डॉ.भरत,(२००१),१८५७ की क्रांती और उसके प्रमुख क्रांतीकारी,राधा पब्लिकेशन.दिल्ली,पान ८१.